Vol. I, Issue. I / February 2011, pp.70-75

Research Paper - Education

# उच्च शिक्षणाच्या संदर्भात जागतिकीकरण, खाजगीकरण व व्यवसायिकीकरण

- प्राचार्य. डॉ. ह. ना. जगताप
एस. व्ही.सी.एस. शिक्षणशास्त्र महाविद्यालय,सोलापूर

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :-**

भारतात प्राचीन काळी जे शिक्षण दिले जात असे ते गुरुकुलामधून. या गुरुकुलामध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना त्यांचे विद्यार्थी स्वेच्छेने गुरु दक्षिणा देत असत. त्यावर त्यांचा चरितार्थ चालत असे. तसेच गुरुकुलाच्या प्रशासनाचा खर्चही भागत असे. बुध्दिस्ट शिक्षणपध्दतीमध्ये मठांमधून शिक्षणाची सोय केली जात असे. नालंदा व तक्षशीला या विद्यापीठांतून परदेशी विद्यार्थीही शिक्षण घेत असत. हे शिक्षण सर्वसामान्य विद्यार्थी घेत नसत, तर ज्यांना शिकण्याची तीव्र इच्छा आहे व ज्यांच्याकडे एवढी का होईना खर्च करण्याी ऐपत आहे असे उच्चवर्णिय लोकच शिक्षण घेत असत. उच्च शिक्षणाचा व दैनंदिन जगण्याचा निकटचा संबंध नव्हता. त्यामुळे सर्व सामान्यांना याविषयी काहीही देणे घेणे नव्हते.

मध्ययुगीन काळात तर शिक्षण पूर्णपणे खाजगी स्वरुपाचे होते. इंग्रजांच्या आगमनानंतरच शिक्षणाकडे पाहण्याची वेगळी दृष्टी प्राप्त झाली. १६७७ मध्ये प्रथमच ईस्ट इंडिया कंपनीने इंग्रजी शिकविण्यासाठी पगारी शिक्षकाची नेमणूक केल्याचे आढळून येते. इ.स.१८५४ च्या वूडच्या खलित्याने शिक्षणाला एक प्रकारची शिस्त लावली. तसेच येथेच सूत्र सुरु झाले. सन १८५७ मध्ये भारतामध्ये विद्यापीठांची मुहूर्तमेढ रोवली गेली. या विद्यापीठांना शासनाकडून आर्थिक मदतही मिळू लागली.

स्वातंत्र्यानंतर १९४८-४९ मध्ये नेमलेल्या राधाकृष्णन् आयोगाच्या शिफारसीमुळे विद्यापीठीय शिक्षणाला गती प्राप्त झाली. सन १९५०-५१ मध्ये भारतात ३७ विद्यापीठे व त्यांना संलग्न असलेली ७०० महाविद्यालये अस्तित्वात होती. त्यामध्ये वेळोवेळी वाढ होत गेली. आज २७३ विद्यापीठे असून त्यामध्ये ५२ अभिमत विद्यापीठे आहेत. या २७३ विद्यापीठापैकी १६२ पारंपारिक विद्यापीठे ४० कृषी विद्यापीठे, १८ वैद्यकीय विद्यापीठे, ३३ अभियांत्रिकी, १ वृत्तपत्र विद्या, ६ विधी विद्यापीठे, ९ संस्कृत विद्यापीठे तर १० मुक्त विद्यापीठे आहेत. १९९९-२००० मध्ये भारतात ११,००,८३१ महविद्यालये आहेत. यामध्ये एकूण ९१,८५,५४८ विद्यार्थी हेच प्रमाण वाढवून २००३-०४ मध्ये १५,००० महाविद्यालये व ९०,००० झाले असण्याची शक्यता आहे. याशिवाय च्या अहवालानुसार २००२-०३ मध्ये अभियांत्रिकी, फार्मसी, व्यवस्थापनशास्त्र इ. विषयांचे शिक्षण देणाऱ्या ४,१४५ संस्था असून त्यामध्ये ५,४२,७४७/-विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

वरील आकडेवारी वर्धिष्णू असली तरी समाधानकारक नाही. कारण आजही १७-२३ या वयोगटातील युवकांपैकी उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये आपण केवळ ७% विद्यार्थ्यांनाच सामावून घेवू शकत आहोत. काही राष्ट्रात हेच प्रमाण ५०% पर्यंत आहे. इतकेच नव्हेतर इंडोनेशिया सारख्या अप्रगत राष्ट्रामध्ये देखील हे प्रमाण १३% इतके आहे. आपले राष्ट्रपती मा. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्वप्नातील भारत (२०२०मधील) घडवायचा असेल तर हे प्रमाण वाढावयास हवे. भारत सरकारने१० व्या पंचवार्षिक योजनेमध्ये उच्च शिक्षणातील ६% ही क्षमता १५% वाढविण्याचे योजिले आहे. त्यासाठी २०१० पर्यंत विद्यापीठांची संख्या १६०० तर महाविद्यालयाची संख्या १,८९,२९३ इतकी होणे अपेक्षित आहे. परंतु हे व्हावे कसे ? भारत सरकारने १९१७ साली विश्व बँकेच्या (World Bank)शिफारसी उचलून धरुन उच्च शिक्षणाला दिले जाणारे अनुदान (Susidi) पाच वर्षात ९०% वरुन २५% वर आणण्याची पावले उचलली आहेत. एप्रिल २००० मध्ये अंबानी बिर्ला रिपोर्ट (A policy Frame Work For Reforms in

Education.) पंतप्रधानांना सादर करण्यात आलेले आहे. त्यामध्ये देखील उच्च शिक्षणातील काही विषयांसाठी अनुदानात कपात केली जावी असे सुचविलेले आहे. केरळ सारख्या साम्यवादाचा प्रभाव असणाऱ्या शासनाने २००१ साली प्रसिध्द केलेल्या श्वेतपत्रिके मध्येदेखील केरळ शासनाने ६२-६३ साली शिक्षणासाठी असणाऱ्या ३०% इतक्या अंदाजपत्रकीय तरतूदीपेक्षा कमी तरतूद २०००-२००१ साठी (२१%) केलेली आहे. थोड्या फार फरकाने सर्वच राज्य सरकारांनी उच्च शिक्षणावरचा खर्च कमी करण्याचे धोरण अवलंबिलेले दिसून येते. एका बाजूला उच्च शिक्षणात वाढ व्हायला हवी व शासन पैसा द्यायला हात आखडले आहे. अशा परिस्थितीत उच्च शिक्षण कसे दिले जावे? यासाठी काही नवीन पर्यायांचा मार्गांचा शोध घेता येईल का? यामधूनच खाजगीकरणाचा पर्याय पुढे आलेला आहे. करण्याचे धोरण अवलंबिलेले दिसून येते. एका बाजूला उच्च शिक्षणात वाढ व्हायला हवी व शासन पैसा द्यायला हात आखडले आहे. अशा परिस्थितीत उच्च शिक्षण कसे दिले जावे? यासाठी काही नवीन पर्यायांचा मार्गांचा शोध घेता येईल का? यामधूनच खाजगीकरणाचा पर्याय पुढे आलेला आहे.

**खाजगीकरण का व कशासाठी?**

वास्तविक वरील चर्चा अभ्यासल्यावर पुन्हा हा प्रश्न पडावयास नको. परंतु केवळ खर्च कमी करणे एवढेच काही खाजगीकरणाचे कारण नाही. ते एक महत्वाचे व प्रमुख कारण आहेहेही खरेच परंतु याशिवाय देखील खाजगीकरण करण्याची काही कारणेआहेत.

१) खाजगीकरणांमुळे उच्च शिक्षणामध्ये शासनाचा हस्तक्षेप होत नसल्याने जनतेला खऱ्या अर्थाने स्वत:च्या इच्छेने व हवे ते शिक्षण घेता येईल. उच्च शिक्षणामध्ये शासकीय हस्तक्षेपा मुळे, प्रवेश, अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, फी इ.बाबी, संबंधी सध्या किती गोंधळ होत आहे याचा प्रत्यय केंद्रीय पातळीवर व राज्यपातळीवरही आपण नुकताच अनुभवला आहे व अनुभवत आहोत. स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या तत्कालीन सन्माननीय नेत्यांनी उच्च शिक्षणात शासनाने हस्तक्षेप करु नये असा आग्रह धरला होता. ही गोष्ट लक्षात घेतली पाहीजे.

२) शासकीय यंत्रणेमधील ढिसाळपणा, शासकीय अधिकाऱ्यांची मनमानी, विविध पक्षांच्या कडबोळ्यांनी बनलेली सरकारे व त्यांचे लहरी निर्णय, राजकीय नेत्यांचा हस्तक्षेप, शिक्षक संघटना व विद्यार्थी संघटनांचे दबाबवतंत्र यामुळे शिक्षणाची गुणवत्ता दिवसेंदिवस खालावत चालली आहे. अगदी उदाहरणच द्यावयाचे तर पाटणा विद्यापीठाचे देता येईल. पाटणा विद्यापीठाच्या कुलगुरुंनी राज्यपालांना लिहिलेल्या पत्रातील पुढील काही ओळी सध्याच्या उच्च शिक्षणाची दुरावस्था दाखविणाऱ्या आहेत. या पत्रात ते म्हणतात,'' The buildings of this oldest university in Bihar are in a state of despair. They need urgent attention. The science laboraties are on the urge of closure for want of chemicals, apparatus specimerns, animals and so on. Once considered the host equipped science laboratory East & Suez the Patana Science college is reeling for want of funds. Examiners have not been paid their remuneration and some times T.A. bills of external किंवा ढिसाळपणा परवडणार नसतो. आपल्या कार्यक्षमेवर व विश्वासार्हतेवर आपले अस्तित्व अवलंबून आहे याची जाणीव येथे ठेवावी लागते.

examiners are also held up or delayed. In fact some examiners have refused to return the evaluated anser books as their remuneration have been held up. all these disclocate examination schedules and is a part of various circles that destroys the reputaiton of any University." उच्च शिक्षणाचे धिंडवडे म्हणजे काय हे वरील वस्तुस्थितीवरुन लक्षात येईल. थोड्या फार फरकाने अनेक विद्यापीठांचा प्रवास याच दिशेने सुरु आहे. अशाच आशयाची तक्रार केरळ विद्यापीठाच्या कुलगुरुंनी देखील एका सेमिनारमध्ये व्यक्त केली आहे. येथे केवळ पैशाचा अभाव हे कारण नाही तर शासनाची उदासिनता व मुजोर शासकीय

अधिकाऱ्यांच्या बेमुर्वतखोरपणा हेही घटक कारणीभूत ठरतात. खाजगी संस्थेमध्ये अशी मुजोरी किंवा ढिसाळपणा परवडणार नसतो. आपल्या कार्यक्षमेवर व विश्वासार्हतेवर आपले अस्तित्व अवलंबून आहे याची जाणीव येथे ठेवावी लागते.

३) समाजात असणाऱ्या विविध कार्यक्षम व्यक्तिंचा शोध घेउन त्याचा कार्यक्षमतेचा पुरेपुर उपयोग करण्याची व्यवस्था शासकीय प्रणालीमध्ये असत नाही. कारण शासनाची धोरणे, राजकीय पक्ष, आंतरराष्ट्रीय धोरणात होणारे बदल, दर पाच वर्षांनी शासनाच्या विचारप्रणालीमध्ये बदल होण्याची शक्यता, यामुळे गुणवत्तेचा शोध घेण्याऐवजी राजकीय सोय पाहून माणसेने शासनाचा कल असतो. त्यामुळे शिक्षण उत्कृष्टतेच्या पातळीवर पोहोचणे कठीण बनते. शिक्षण संस्थाच हळूहळू राजकीय अड्डे बनू लागतात. दिल्लीतील काही विद्यापीठेही यासाठी प्रसिध्द आहेत.

४) जागतिकीकरणामुळे बाहेरच्या देशातील विविध विद्यापीठे भारतात येऊन आपल्या विद्यापीठाच्या पदव्या देण्यासाठी येथे अभ्यास केंद्राचा शोध घेऊ लागलेली आहेत. अशा या विद्यापीठांची संलग्नता घ्यावयाची असेल तर शासकीय यंत्रणेतील महाविद्यालये घेवूच शकणार नाहीत किंवा त्यासाठी खूपच उशीर लावतील. या ऐवजी खाजगी महाविद्यालये या नवीन परिस्थितीशी लवकर जुळवून घेवू शकतील.

५)खाजगी महाविद्यालये स्थापन झाल्यामुळे शिक्षणाचे तसेच शिक्षण क्षेत्रातील सत्तेचे विकेंद्रीकरण होणार आहे. त्यामुळे निर्णय प्रक्रिया अधिक गतीने व सुलभतेने होवू शकेल. त्यामुळे अभ्यासक्रमात, पाठ्यपुस्तकांत, व्यवस्थेत करावे लागणारे बदल वेळीच करता येतील.

६) सन २००२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणाला उचलून धरलेआहे. त्यांच्या मते व्यक्तिने मिळवलेली पदवी ही Public good (सार्वजनिक मालमत्ता) नसून खाजगी मालमत्ता (Private good) आहे. त्यामुळे उच्च शिक्षणाच्या खाजगीकरणाला नैतिक अधिष्ठान प्राप्त झालेले आहे. एवढेच नव्हे तर कोर्टाने पुढेजावून हेही सांगितले आहे की, कोणत्याही संस्थेला माफक नफा घेवून महाविद्यालय चालविता येईल. मात्र अशा संस्थेने नफेखोरी करु नये.

वरील सर्व मुद्यांचा विचार केल्यावर असे वाटण्याची शक्यता आहे की, खाजगीकरणाने सर्वत्र गुणवत्तेचेच फुटेल असे वाटणे हा एक भ्रम आहे. कारण केवळ खाजगीकरणाने प्रश्न सुटणार नाहीत. खाजगी संस्था गुणवत्ता पूर्ण व्हायच्या असतील तर संस्था चालकाची प्रामाणिकता, महाविद्यालयाच्या प्रमुखाची कार्यक्षमता, सहकाऱ्यांच्या गुणांचा शोध घेऊन त्याचा उपयोग करण्याची क्षमता, काळानुरुप कोर्सेसमध्ये व स्वत:च्या मनोवृत्तीत बदल करण्याची क्षमता, दूरदृष्टी व मानसिक भान यावर बरेच काही अवलंबून आहे.

**जागतिकीकरण**

सध्या संपूर्ण जगात ही संकल्पना मान्य होऊ लागलेली आहे. सन २००० मध्ये World Trade Organization ने उच्च शिक्षणाला गॅटखाली (General Agreement on Trade Services.) आणलेले आहे. गॅट करारामुळे ज्या सेवांचे जागतिकीकरण होणे अपेक्षित आहे. त्यामध्ये उच्च शिक्षणाचा समावेश केल्यामुळे ही सेवा शासनाच्या जोखडातून मुक्त होत आहे. त्यामुळे शिक्षणक्षेत्रात आंतरराष्ट्रीय देवाणघेवाण शक्य होणार आहे. सध्या अमेरिकेतून निर्यात होणाऱ्या एकवीस सेवांपैकी पाचव्या क्रमांकाची ही सेवा आहे. सध्या जगामध्ये३० बिलियन डॉलरची उलाढाल ही या सेवाक्षेत्रात होत आहे. गॅट करारामध्ये २९ कलमांचा समावेश आहे. ज्यावेळी एखाद्या देशात शिक्षण हे पूर्ण शासनाच्या अखत्यारित असतेतेव्हा ते गॅट करारामध्ये येत नाही. परंतु भारतामध्ये उच्च शिक्षणाबाबत अशी परिस्थिती नसल्याने उच्च शिक्षण हे आपोआप गॅटच्या छत्राखाली येते. त्यामुळे आपण कळत नकळत आपोआप जागतिकीकरणाकडे जातो. माहिती तंत्रज्ञानाची झपाट्याने होत असलेली प्रगती , वाढती स्पर्धा आणि उच्च शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन यामुळे भारतालाही यापासून दूर राहणे अशक्य झालेले आहे.

भारतामध्ये उच्च शिक्षण पूर्ण पणे शासनाच्या अखत्यारित नसल्याने आपोआपच गॅटच्या अंमलाखाली येते. या खाजगी संस्था आता सरळ शासकीय संस्थांशी तसेच इतर खाजगी

संस्थांशी स्पर्धा करण्यासाठी तयार होत आहेत. त्याचा परिणाम म्हणून दिवसेंदिवस शासन या क्षेत्रातून बाहेर पडू इच्छितो. त्यामुळेच १९९५ साली संसदेपुढे खाजगी विद्यापीठा संबंधीचे विधेयक मांडले गेले. त्यानुसार छत्तीसगढ राज्यात त्याची अंमलबजावणी सुरु झाली. तर महाराष्ट्र शासनाने खाजगी विद्यापीठाचे विधेयक पास करण्याचे वृत्त आहे.

परिणामी आता आपले संस्थाचालक परदेशी विद्यापीठाशी करार करुन येथे त्या विद्यापीठाशी संलग्न, महाविद्यालये काढू शकतील किंवा परदेशी संस्था येथे थेट विद्यापीठांची किंवा महाविद्यालयांची स्थापना करु शकतील. जगातील सर्वच देशातील शिक्षणसंस्थाना स्पर्धेसाठी मुक्त वातावरण तयार झालेले आहे. सध्या इंग्लंड, अमेरिका, कॅनडा सारख्या देशात आपल्या केवळ विद्यार्थीच नव्हे तर शिक्षक देखील नोकरीसाठी जाऊ लागले आहेत. पूर्वी ही मक्तेदारी फक्त प्रोफेशनलचीच होती. या सर्व बाबींचा विचार करता आपले Product अधिकाधिक दर्जेदार ठेवणेही प्रत्येक शिक्षण संस्थेची जबाबदारी राहणार आहे. आपल्या संस्थेचा दर्जा आता केवळ संस्थेचे वय, संस्था चालकांचे समाजातील स्थान, इमारत व भौतिक सुविधा किंवा प्रादेशिक अपरिहार्यता यावर अवलंबून राहणार नाही तर आपल्या ला बाहेर किती मागणी आहे यावर अवलंबून असणार आहे. आता एखाद्या संस्थेची जगामध्ये किमान ओळख व्हावयाची असेल तर त्या संस्थेला मान्यता प्राप्त संस्थेकडून गुणवत्तेसंबंधीचे प्रमाणपत्र हवे. म्हणून नॅक सारखी संस्था कार्यरत आहे. सोलापूर सारख्या अप्रगत प्रदेशातील एखाद्या कॉलेजचा विद्यार्थी अमेरिकेत जाईल त्यावेळी तेथे तो किमान कोणत्या दर्जाच्या महाविद्यालयात शिकला हे पाहण्यासाठी महाविद्यालयाला नॅकच्या प्रमाणपत्राची आवश्यकता असणार आहे. आपल्यालाही जगात इतरत्र महाविद्यालये काढण्याची चांगली संधी उपलब्ध झालेली आहे. सध्या CBSE ने भारताबाहेर १०० माध्यमिक शाळांना संलग्नता दिलेली आहे. तर हैद्राबादच्या इंग्लीश इन्स्टिट्यूटने किरिगिस्तानमध्ये इंग्रजी अध्यापन कार्यक्रमास सुरु केलेला आहे. महाराष्ट्रात प्रचंड संख्येनेबी.एड्.कॉलेजेस काढणाऱ्या संस्थाचालकांना सर्व जग रिकामे आहे. बाहेरचे विद्यार्थी आपल्याकडे आकर्षित करावयाचे असतील तर सकस अभ्यासक्रम, उत्कृष्ट भौतिक सोयी, अत्याधुनिक शैक्षणिक साधनेव उत्तम शिक्षक वर्ग यांची आवश्यकता आहे हे व्हावयाचे असेल तर किचकट शासकीय नियम, विद्यापीठांचे संथगतीने बदलणारे अभ्यासक्रम, केवळ संघटनेच्या जोरावर टिकवून राहिलेल्या कामचुकार कर्मचारी वर्ग हे सर्व बदलणे आवश्यक आहे. यासाठीच्या विविध पर्यायापैकी एक पर्याय म्हणजे स्वायत्त महाविद्यालये.

**स्वायत्ता :-**

महाविद्यालयांनी शासनाच्या व विद्यापीठाच्या जोखडातून मुक्त होवून आपले अभ्यासक्रम ठरविणे, प्रवेशाचे नियम ठरविणे, फी ठरविणे, मूल्यमापन व्यवस्था ठरविणेव अंतिमत: आपणच विद्यार्थ्याला प्रमाणपत्र देणे, इ. बाबींची जबाबदारी स्वीकारणे स्वायत्तेमध्ये अभिप्रेत आहे. भारत सरकारने व महाराष्ट्र शासनाने देखील अशा स्वायत्तेसाठी सतत आग्रह धरलेला आहे. परंतु त्याचा विशेष परिणाम झालेला नाही. शिवाजी विद्यापीठाच्या क्षेत्रामध्ये २७३ महाविद्यालयापैकी केवळ एका महाविद्यालयाने स्वायत्तता स्विकारायचे धाडस केलेले आहे.

स्वायत्तत्ता या संकल्पनेबाबतचे अज्ञान, कर्मचाऱ्यांना सेवा शाश्वतीसंबंधी वाटणारी भीती, कर्मचारी संघटनांचा दबाव, शासनाच्या धोरणातील धरसोड वृत्ती व त्यामुळे संस्थाचालकांना शासन यंत्रणेबाबत वाटणारी भिती, विद्यार्थ्यांचा व पालकांचा गैरसमज व अशा संस्थेसाठी अथक परिश्रम घेण्याच्या वृत्तीचा अभाव या बाबी स्वायत्तत्तेच्या प्रसारात अडसर बनत आहेत. एखादे महाविद्यालय स्वायत्त बनायचे असेल तर त्यातील शिक्षकांना, अभ्यासक्रम तयार करण्यापासून परीक्षेचे पेपर तपासणी पर्यंतचे काम करावी लागणार आहे. सध्या ही कामेसर्वच शिक्षकांना करावी लागत नाहीत. केवळ हे काम करुन भागण्यासारखे नाही तर ते दर्जेदारपणे करावे लागणार आहे. बरे शिक्षकांनी हे काम करायचे ठरविले तरी संस्थाचालकांचे काय? केवळ मनमानीपणे नोकर भरती करुन व लाखो रुपयांच्या देणग्या उकळणे एवढ्याच किमान

उद्देशाने संस्था चालविणाऱ्या संस्था चालकांना हे कसे परवडेल? संस्थाचालक ज्ञानी असलाच पाहिजे अशी अपेक्षा नाही, परंतु तो किमान शिक्षणप्रेमी तरी असावा तरच हे होणे शक्य आहे.

**उत्तरदायित्व :–**

शिक्षण संस्थांच्या स्वायत्तेची यशस्विता ही संस्थे मध्ये काम करणाऱ्या प्रत्येकाच्या उत्तरदायितत्वावर अवलंबून आहे. प्रत्येक घटकाने आपण कोणाला तरी उत्तरदायी आहोत याचे भान ठेवले पाहिजे. आज अनुदानित संस्थामध्ये तर सेवक आपल्या प्रमुखालाही जुमानत नाहीत, कारण त्याची धारणा अशी आहे की मला शासन वेतन देते त्यामुळे संस्थेचा संबंध काय? ही मानसिकता बदलणे आवश्यक आहे. तुलनेने अशासकीय व विना अनुदानित संस्थांमध्ये ही प्रवृत्ती कमी प्रमाणात आढळून येते. आज अशा विना अनुदान संस्थांमध्येही प्रवृत्ती कमी प्रमाणात आढळून येते. आज अशा विना अनुदान संस्थांमध्ये शिक्षकांची नव्हे तर संस्थाचालकांची मुजारेवृत्ती आढळून येते. आपण विद्यार्थ्याकडून फी घेतो तर त्याला त्याचा मोबदला देण्याची जबाबदारी आपली आहे याचे किमान भान संस्था चालकांनी ठेवले पाहीजे. विद्यार्थ्यांना आवश्यक त्या शैक्षणिक व भौतिक सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे, शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना किमान त्यांच्या हक्काचे वेतन देणे हे आपलेनैतिक व वैधानिक उत्तरदायित्व आहे याचे भान संस्था चालकांनीही ठेवले पाहीजे.

**व्यवसायीकरण :–**

उच्च शिक्षण केवळ स्वान्तसुखाय असता कामा नये. अशी कल्पना वारंवार मांडली जात आहे. वस्तुत: व्यवसाय शिक्षण देणे हाच काही विद्यापीठाय शिक्षणाचा हेतू नसतो. परंतु कोणत्या तरी व्यवसायासाठी आवश्यक ते ज्ञान, कौशल्य व आत्मविश्वास या शिक्षणाने निर्माण व्हावा. हेही खरेच. सन २००१-०२ च्या आकडेवारीनुसार उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये कला शाखा ४६.१३% , विज्ञान १९.८८%, कॉमर्स१७.८७% असे प्रमाण आढळून येते. म्हणजेच उच्च शिक्षण घेणाऱ्यामध्ये व्यवसाय शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण खूपच कमी आहे. आता तर पदवीधारकांना नोकऱ्या नाहीत किंवा कोणताही व्यवसाय करता येत नाही. कारण या कोर्सेसमध्ये तशी काही तरतूदच नाही. म्हणून आता व्यवसाय शिक्षणाच्या स्वतंत्र कोर्सेस शिवाय देखील सामान्य विद्याशाखातून व्यवसाय शिक्षणाची सोय केली पाहीजे. केवळ बेकरी आहेम्हणून ही उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी खूप आहेत असे विद्यार्थी सर्वसाधारणपणे आर्टस्, कॉमर्स व विज्ञान शाखेकडे जातात व शिकल्यानंतर पुन्हा उच्चशिक्षित बेकार होतात. म्हणून आर्टस्, सायन्स, कॉमर्स अशा विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांना अभ्यास करुन पदवीधर होईल त्याचवेळी त्याला किमान कोणत्यातरी एखाद्या व्यवसायासाठीच कौशल्येप्राप्त झालेली असतील, अशी पाठ्यक्रमाची रचना करणे आवश्यक आहे. विद्यार्थी कोणत्याही विषयाचा पदवीधर होणार असेल तर त्याला एक व्यवसाय करता आलाच पाहिजे अशी सोय सामान्य शिक्षणात केलीच पाहीजे, तरच बेकारीचा बागुलबुवा कमी होईल.

**खाजगीकरण व जागतिकी करणांत शासनाची भूमिका :–**

शासन जर उच्च शिक्षण द्यायला केवळ समर्थ नसेल व खाजगी संस्थांनी हे उच्च शिक्षण द्यावे ही जर शासनाची अपेक्षा असेल तर शासनाने उच्च शिक्षण द्यायला केवळ परवानगी देऊन भागणार नाही, तर अशा संस्थांना उत्तेजन दिले पाहीजे. शासनाने अशा संस्थांना खऱ्या अर्थाने स्वायत्ता द्यायला हवी. शासनाने पुढील बाबतीत संस्थांच्या कारभारात लुडबुड करु नये.

- **प्रवेश:–** कोणत्याही कोर्ससाठी किमान पात्रते संबंधी नियम तयार करुन त्यानुसार संस्था विद्यार्थी प्रवेशाचेपूर्ण अधिकार द्यावेत. जर एखादी संस्था विद्यार्थ्यावर अन्याय करते आहे असे वाटत असेल तर प्रवेशासंबधीची न्यायाधिकरणे स्थापन करावीत व विद्यार्थ्यांना तेथून न्याय देण्याची व्यवस्था व्हावी. अशी तरतूद १९९४ च्या महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यामध्ये आहे. परंतू त्याची अंमलबजावणी झालेली दिसत नाही. यासाठी महाराष्ट्र शासनाने काझी समितीचे गठण केले आहे. ही समिती आपली मांडलिक आहे असे शासनाने समजू नये.
- **फी निश्चिती :-** एखादी संस्था चालविण्यासाठी येणारा खर्च भरुन निघेल एवढी फी घेण्याची मुभा संबंधित संस्थेला

हवी. त्याशिवाय विकासासाठी निधी उभा करण्याची मुभाही संस्थेला हवी. सध्या न्या. पंडित समिती हे कार्य करीत आहे.

- **नोकरभरती व त्यांच्या सेवाशर्ती ठरविण्याचे सर्व अधिकार:–** संस्थांना द्यावयास हवेत. तसे स्पष्ट संकेत ही सुप्रीम कोर्टाने २००२ च्या निकालात दिलेले आहेत. फार तर शासनाने विविध पदांसाठी किमान शैक्षणिक पात्रता ठरवून द्यावी. मात्र कोणत्याही कर्मचाऱ्यांवर अन्याय होऊ नये यासाठी ट्रिब्यूनलची सोय व्हावी. सध्या अशी ट्रिब्यूनल्स देखील आहेत.
- **शासनाने स्वत: प्रत्येक फॅकल्टीचे किमान एकेक महाविद्यालय चालवावे:–** ते अत्यंत आदर्श असावे. इतर संस्थाना चालविण्यासाठी किती खर्च येतोव कोणकोणत्या अडचणी येतात हेही लक्षात येईल.
- **उद्योग :-** क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी काही पायाभूत सोयी शासन पुरविते तसेच सवलतीच्या दरात वीज, पाणी, रस्ते इ. सोयी देते. त्याचप्रमाणे एखादे खाजगी महाविद्यालय किंवा विद्यापीठ स्थापन करण्यासाठी काही सेच सवलतीच्या दरात जमीन, वीज, पाणी इ. बाबी पुरवाव्यात.
- मूलभूत सोयी शासनाने पुरवाव्यात. तसेच सवलतीच्या दरात जमीन, वीज, पाणी इ. बाबी पुरवाव्यात.
- **उच्चशिक्षण:-** घेऊ इच्छिणाऱ्या परंतु अत्यंत गरिब विद्यार्थ्यांना फी परवडणारी नाही नसेल तर त्याचा काही वाटा शासनाने उचलावा. तसेच या विद्यार्थ्यांना, शिकत असताना नोकरी करण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी.
- **संस्थाचालकाकडे:-** जमा होणारी फी आणि होणारा खर्च याचा ताळेबंद पाहिला जावा तसेच कोणतीही संस्था समाज विघातक शिक्षण देत नाही ना। इकडेही लक्ष दिले जावे.

विविध विद्यापीठ, AICTE, NCTE, NAAC अशा गुणवत्ता पाहणाऱ्या संस्थाकडून संस्थांच्या दर्जाबाबत तपासणी व्हावी. तसेच यास संस्थांकडून मार्गदर्शनही व्हावे. अशा संस्थामार्फत येणाऱ्या समित्यांनी मार्गदर्शकाची भूमिका ठेवावी त्यांनी फौजदाराची भूमिका घेऊ नये.

शिक्षण संस्थांनी आता आपल्या Product ची Guarantee देण्याची वेळ आलेली आहे. आमच्या संस्थेतून बाहेर पडणारा विद्यार्थी हमखास असा असेल म्हणण्या इतकी आपली तयारी झाली पाहीजे, म्हणजे निश्चित दर्जेदार असणार अशी खात्री समाजाला वाटली पाहीजे.

खाजगीकरण, जागतिकीकरण, उदारीकरण या बाबी योग्य की अयोग्य हे ठरविण्याची वेळ निघून गेलेली आहे. आता आपल्याला आवडीनाआवडी याचा स्वीकार अपरिहार्य आहे. या बाबींचा प्रगतीसाठी कसा उपयोग करुन घेता येईल याचाच विचार करणे रास्त ठरेल.